# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### अंबाजोगाई, (जि. बीड) नगर परिषद मधील नगरपालिकेची जमिन अधिकाऱ्यांच्या संगनमताने राजकीय व्यक्तींना दिल्याबाबत

**(१) ३४८८८ (०२-०२-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, (जि. बीड) नगर परिषद मधील अभिन्यास रद्द करताना मुख्याधिकारी श्री.जगताप, नगरपरिषद, अंबाजोगाई श्री.कस्तुरे नगररचनाकार, नगरपरिषद, अंबाजोगाई आणि नगररचनाकार बीड श्री.चारठाणकर व त्यांच्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांनी दि. १६ सप्टेंबर, २०२० रोजी अंबाजोगाई, नगरपरिषद, अंतर्गत सर्वे नं. ३५८/३५९ अभिन्यास रद्द करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, अंबाजोगाई नगरपालिका सत्ताधाऱ्यांकडून चुकीच्या कामांना मदत केली जात आहे तसेच शासनाची जमिन अंबाजोगाई नगरपालिका आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने त्यांच्या जवळील राजकीय व्यक्तीस दिली जात असल्याची बाब आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी अंबाजोगाई नगरपालिकेची जमिन मोजक्या राजकीय व्यक्तींना दिल्यामुळे अंबाजोगाई नगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२३) :**(१) जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधितांविरुद्ध कार्यवाहीचे निर्देश दि. २५ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि. २५ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या आदेशान्वये संबंधितांविरुद्ध कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

तथापि, सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.९८२/२०२१ व दिवाणी अर्ज क्र.५३५८/२०२१ मध्ये जिल्हाधिकारी, बीड यांनी दि. २५ ऑक्टोबर, २०२० रोजी दिलेले आदेश “Set aside” करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी पुढील ६ महिन्यात जिल्हाधिकारी, बीड यांनी पुनश्च विचार करुन निर्णय घ्यावा, असे मा.उच्च न्यायालयाने दि. २३ जून, २०२१ रोजी आदेश पारित केले आहेत.

---

### दक्षिण नागपुरातील सक्करधरा तलावाकरीता उर्वरित बांधकाम निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) ४२७८६ (२७-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण नागपुरातील सक्करधरा तलावाच्या सौंदर्यीकरण कामाला लेखा शीर्ष ४२१७०५१७ सन २०१९-२०२० ला १० कोटी रुपयाचा निधी नागपूर महानगर पालिकेला मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधी अंतर्गत तलावाचे २०% काम पूर्ण करून निधीची उपलब्धता न झाल्याने ८०% काम अपूर्ण स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ८०% तलावाचे काम अपूर्ण असल्याने परिसरात अपघाताचे प्रमाण वाढले असून नागरीकांना दळणवळण करण्यास त्रास होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्या, उपरोक्त प्रमाणे ८०% काम पुर्ण करण्याकरीता उर्वरित निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) शासन निर्णय दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ अन्वये सन २०१९-२० करीता लेखाशिर्ष (४२१७०५४१) अन्वये "भोसलेकालीन सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण करणे" या कामाकरीता रक्कम रुपये ९,९९,९५,९६०/-कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) शासन पत्र दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ अन्वये रुपये ९.४३ कोटी निधी "भोसलेकालीन सक्करधरा तलावाचे सौंदर्यीकरण करणे" या कामासाठी वर्ग करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोराटी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद सिंचन मंजूर तलावाचे काम भूसंपादनाअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ४८३३१ (१०-११-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोराटी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे डोंगराळ परिसर असल्याने व उन्हाळयामध्ये परिसरामध्ये दुष्काळ पडत असल्याने जनावरांना पाणी व शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणी उपलब्ध व्हावे म्हणून जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत पाझर तलावाच्या बांधकामाकरीता निधी मंजूर करण्यात आला परंतू तलावाचे काम अद़्यापही अपूर्ण असल्याचे दिनांक ६ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाझर तलाव बांधकामाकरिता जमिन भुसंपादन करणे अश्यक्य होते, जिल्हा नियोजन मधून जमीन संपादनास निधी देण्यात येतो परंतू संबंधीत विभागाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने मंजूर तलावाचे काम झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने मंजूर तलावाचे काम त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) सदर तलाव मृद व जलसंधारण विभाग,यवतमाळ कार्यालयाचा असून सदर प्रकल्पाचे घळ भरणीचे काम बाकी आहे. प्रचलित शासन निर्णयानुसार प्रकल्पाचे संपूर्ण भूसंपादन झाल्याशिवाय प्रकल्पाला गळभरणी करुन पाणी साठा करता येत नाही, त्यामुळे सद्यस्थितीत काम बंद आहे.
(२) नाही, सदर प्रकल्पाला दि.११.०१.२०१९ रोजी महामंडळाची मान्यता प्राप्त आहे.

जलसंधारण महामंडळ मौजे बोराटी शिवारातील ५.६१ हे आर जमीनीच्या खरेदीकरीता १०६.३६ लक्ष निधी दि.३१.०३.२०२२ रोजी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व दि.०५.०७.२०२२ पर्यंत बोराटी शिवारातील २.८५ हे आर जमीनीची खरेदी पूर्ण करण्यात आली आहे. व २.७६ हे आर जमीनीच्या संपादनाची कार्यवाही सुरु आहे.

मौजे सराटी गाव शिवारातील ४.९९ हे आर जमीनीच्या खरेदीकरीता निधी उपलब्ध नसल्याने ४.९९ हे आर जमीनीची खरेदी प्रलंबित आहे. उर्वरित भूसंपादन व प्रकल्पाच्या बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) मौजे सराटी गाव शिवारातील ४.९९ हे आर जमीनीच्या खरेदीकरीता निधी उपलब्ध नसल्याने ४.९९ हे आर जमीनीची खरेदी प्रलंबित आहे. उर्वरित भूसंपादन व प्रकल्पाच्या बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मृद व जलसंधारण विभागातील एन. के. कन्स्ट्रक्शन कंपनी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करणेबाबत

**(४) ४८८१९ (१४-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंधारण महामंडळाच्या आकांक्षित योजनेतील गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली, चामोर्शी, सिरोंचा, अहेरी सह अन्य तालुक्यात एन. के. कन्स्ट्रक्शन कंपनी मार्फत ७२ कोल्हापूरी बंधाऱ्यांचे शेतीकामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एका बंधाऱ्याच्या सर्वेक्षणाच्या कामासाठी ३ लक्ष रुपये देण्यात येत असून अधिकारी ६० टक्के व कंत्राटदार ४० टक्के याप्रमाणे रक्कम वाटप करून सर्वेक्षणाची देयके कार्यालयातच बसून केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे पेटी कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून करण्यात आल्याने या कामांमध्ये प्रचंड गैरव्यवहार केला असून उक्त कामे ही निकृष्ट दर्जाची असून उक्त बंधाऱ्यांच्या गेटची कामे न करता कोट्यावधी रुपयांची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदअनुषंगाने उक्त कामाची तातडीने चौकशी करून संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नसून गडचिरोली जिल्हयातील आकांक्षित योजनेंतर्गत चेकडॅमच्या कुठल्याही कामांच्या सर्व्हेक्षणाकरीता रु.३.०० लक्ष निधी तरतूद करण्यात आलेली नाही.
(३) सर्व कामे मे एन. के. कन्स्ट्रक्शन मार्फतच करण्यात येत असून सदर कामे गुणवत्तापूर्वक केलेली असून ज्या टप्प्यातील कामे पूर्ण झाली आहेत तेवढयाच कामांचे देयके अदा करण्यात आली आहेत. कुठेही अतिरिक्त गेटचे देयक अदा करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## मौजे तिवरे भेंदवाडी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील धरणग्रस्त १४ कुटुंबीयांचे गावातच पुनर्वसन करण्याबाबत

**(५) ४९०५७ (१४-१०-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तिवरे भेंदवाडी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथे दिनांक २ जुलै २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या धरणफुटीमध्ये २४ लोकांचा मृत्यू होऊन ५६ कुंटुंबे बेघर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे अलोरे (ता. चिपळूण) येथे ४२ कुंटुंबाचे पुनर्वसन होत आहे, उर्वरित १४ कुंटुंबाचे पुनर्वसन हे तिवरे गावातच व्हावे अशी या १४ कुंटुंबीयांची मागणी आहे. हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी या १४ कुंटुंबियांचे मौजे तिवरे येथील सुरक्षित ठिकाणी उपलब्ध केलेल्या जागेत पुनर्वसन करण्यासाठी मंजूरी देवून निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे तिवरे येथील आपदग्रस्तांचे पुनर्वसनांतर्गत पहिल्या टप्प्यातील १ ते १४ घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर घरांचे प्राधान्य यादीनुसार सोडत पध्दतीने वाटप करण्यात आले आहे. जुलै,२०२१ पासून सदर घरांत बाधित कुटुंबे वास्तव्यास असून उर्वरित ३२ घरांचे पुनर्वसन निधी अभावी अपूर्ण राहिले असून सदर घरांच्या बांधकामासाठी निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील कामांना प्रशासकीय मान्यता दिली असतानाही कामांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्याबाबत**

**(६) ४९४३१ (१०-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने १०१ कामांचे सर्वेक्षण करुन रु १८,६८२.०० इतक्या किंमतीच्य कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता देऊनही या सर्व प्रक्रियेस सुमारे दिड वर्षाहून अधिक कालावधी लागला असल्याने सदर कामांच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामांवर शासनाचा मोठया प्रमाणावर निधी खर्च झाला असल्याने या टप्प्यावर कामास स्थगिती देण्याच्या निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यातील विकास कामे अपूर्ण अवस्थेत राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांचा असंतोष लक्षात घेता शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या उपरोक्त कामांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कामांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) योजनांचे कामांवर खर्च झालेला नाही. दि.११.०१.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनांची निविदा कार्यवाही महामंडळाच्या मान्यतेने सुरु करण्याची मान्यता देण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) स्थगिती देण्यात आलेल्या कामांपैकी दि. ०८.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नांदेड जिल्हयातील एकूण ४६ कामांच्या रु.१०२९८ लक्ष इतक्या निविदेची स्थगिती उठविण्यात आली असून कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांच्या निविदा प्रक्रिया जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळ/कार्यकारी समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत**

**(७) ४९८६९ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा समाजाकडून आरक्षणासाठी लाखोंच्या संख्येने मोर्चे काढण्यात आले परंतु मराठा समाजाला आरक्षण मिळाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्ट्या अडचणींत असलेल्या मराठा समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी मराठा आरक्षण मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंत्रीमंडळ उपसमितीची स्थापना केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे काय, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आर्थिकदृष्ट्या अडचणींत असलेल्या मराठा समाजाला शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना दि.४.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सदर मंत्रिमंडळ उपसमिती कोणताही अहवाल सादर करणार नसून, सदर मंत्रिमंडळ उपसमितीस मराठा आरक्षणासंदर्भातील न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने बाजू मांडण्यासाठी विशेष समुपदेशींच्या नियुक्तींची शिफारस करणे, त्यांचे मानधन ठरविणे, विशेष समुपदेशींना सूचना देणे, मा.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात निर्णय घेणे तसेच, मराठा समाजाच्या मागण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार देण्यात आले आहेत.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५.५.२०२१ च्या आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे राज्य शासनाने त्याविरोधात पुनर्विचार याचिका क्र.१४/२०२२ दाखल केली होती. सदर पुनर्विचार याचिका दि.११.४.२०२३ रोजी फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल केली आहे. सदर उपचारात्मक याचिकेमध्ये तसेच, मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणा-या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांचा एक टास्क फोर्स स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उपचारात्मक याचिका (Curative Petition) फेटाळल्यास मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी त्या समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी एक समर्पित मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात येईल. तसेच, दि.९.१०.२०२० च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास विविध सवलती देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मध्ये सोयीसुविधा उपलब्ध करणेबाबत

**(८) ५०१७७ (२२-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग,मुरुड, रोहा, महाड, माणगाव, रामवाडी व कर्जत (जि.रायगड ) या आगारातून एस.टी.च्या लांब पल्ल्यांच्या शेकडो बसेसने प्रवासी प्रवास करीत असताना तसेच एस.टी.बसेसचा प्रवास सुरक्षित असल्याने एस.टी बसने प्रवास करणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आपातकालीन परिस्थितीत एस.टी.बसमध्ये प्रथमोपचारासाठी प्रथमोपचार पेटया व आगीसारख्या संकटसमयी आवश्यक असणारी अग्निशामक यंत्रणा तसेच बसमध्ये सुरु करण्यांत आलेली वायफाय यंत्रणा या आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,त्यानुषंगाने शासनाने एस.टी.बस मध्ये सुविधा देण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) रा.प. रायगड विभागातील सर्व बसेसमध्ये कामगिरीवरील प्रत्येक वाहकाकडे प्रथमोपचार पेटी देण्यात आलेली असुन ती पेटी प्रवास दरम्यान वाहक आपल्या सोबत ठेवत सतात. तसेच या विभागासाठी ७०० नवीन अग्निशामक यंत्रणा विकत घेण्यात आलेले असून ते बसेसमध्ये उपलब्ध आहेत.

रा.प.बसमध्ये वायफाय (बिनतारी स्थानिक संगणकीय जाळे) युक्त स्मार्टफोनमधून हॉटस्पॉटच्या माध्यमातून (इंटरनेटचा वापर न करता) मोफत मनोरंजनात्मक सुविधा ही राप बसमधील अत्यावश्यक बाबींमध्ये येत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून करण्यात येणा-या कंत्राटी चालकांच्या भरतीबाबत

**(९) ५०९३४ (१९-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), ॲड.राहूल कुल (दौंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून मागील दोन वर्षापासून प्रतीक्षा यादीवरील उमेदवारा ऐवजी ५००० कंत्राटी चालकांची भरती करण्यात येणार होती मात्र कंत्राटी चालकांची भरती स्थगिती करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास सन २०१६, २०१७ ते २०१९ अंतर्गत निवड झालेल्या चालक तथा वाहकाची भरती करण्याचा नवा निर्णय महामंडळाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी चालक हे तांत्रिक पद तथा वाहक हे लेखा विभागाशी संबंधित पद असताना दोन्ही पदे एकत्र केल्याने चालक तथा वाहकांच्या पद निर्मितीमुळे अनेक गरजू बेरोजगार युवकांवर अन्याय होऊन हजारो युवकांची रोजगार अभावी उपासमार होत असतानाही असा निर्णय घेणे उचित होणार नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर भरतीवरील स्थगिती उठवून पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी स्वरूपात केली आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१), (२) होय.
(३) नाही.

सदर पद भरण्याबाबत जाहिरात देताना चालक आणि वाहक या दोन्ही पदातील रिक्त जागा विचारात घेऊन जाहिरात देण्यात येते त्यामुळे चालक तथा वाहकाच्या पद निर्मितीमुळे बेरोजगार युवकांवर अन्याय होत नाही.
(४) होय.
(५) व (६) सन २०१६-२०१७ ते २०१९ अंतर्गत निवड झालेल्या चालक तथा वाहक पदातील जे उमेदवार अंतिम वाहन चालन चाचणी पात्र होऊन नेमणूकीसाठी उपलब्ध उमेदवारांना आवश्यकतेनुसार संबंधित विभागात नेमणूका देण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर करण्यात येत आहे.

---

## राज्यातील एसटीचे प्रवासी आणि उत्पन्न वाढविण्याबाबत...

**(१०) ५१७६२ (२२-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी ट्रव्हल्सला टक्कर देण्यासाठी एसटी महामंडळाने कोकणासाठी ५० नवीन साध्या स्लीपर बस समाविष्ट करण्याचा निर्णय घेऊन एसटी प्रवासांमध्ये वाढ झालेली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, आरामदायी प्रवासासाठी आणि उत्पन्न वाढविण्यासाठी महामंडळ नवे उपक्रम राबवूनही खाजगी ट्रव्हल्सपुढे प्रवासांना आकर्षित करण्यास अपयशी ठरत आहे हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, त्यामुळे खाजगी ट्रव्हल्सप्रमाणे हंगामानुसार एसटी दर बदलते ठेवण्याबाबत प्रवासी संख्येत व उत्पन्न वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१), (२), ३) व (४) नाही.

रा.प. महामंडळात विविध प्रकारच्या नवीन ७०० चासीस महामंडळाच्या ताफ्यात टप्या टप्याने दाखल करण्याची कार्यवाही सुरु असून,अद्याप रा.प.महामंडळात ताफ्यात बसेस दाखल झालेल्या नाहीत.

सध्या रा.प.महामंडळात शिवनेरी, शिवाई, शिवशाही, हिरकणी, साधी या बसेसद्वारे व उपलब्ध साधनसामुग्रीत प्रवासी संख्या व उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. माहे ऑक्टोबर मध्ये १४३६.७० लक्ष व माहे नोव्हेंबरमध्ये १५८१.८१ लक्ष इतकी प्रवाशी संख्या असून प्रवासीी संख्येत वाढ झाल्याचे दिसुन येत आहे. प्रवासी उत्पन्न वाढीसाठी दिपावली सणात परिवर्तनशील भाडेवाढ करण्यात येते.

त्याचप्रमाणे एस.टी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना १००% मोफत प्रवास तसेच महिलांना ५० % प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

---

## काटोल (जि.नागपूर) तालुक्यात एसटी बसेसच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत.

**(११) ५१९५६ (२३-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठया संख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी काटोल येथे शिक्षणाकरिता येत असून एसटी बसेसच्या कमतरतेमुळे त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टीच्या कमतरतेमुळे विद्यार्थी-विद्यार्थीनींना शाळेत पोहचण्यास व घरी येण्यास उशीर होत असल्यामुळे याचा विपरीत परिणाम त्याच्या अभ्यासावर होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या तालुक्यात विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या शालेय वेळा पाहून एसटी बसेसच्या फेऱ्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :**(१), (२) नाही.

(३), (४) काटोल आगारात चालनाकरिता ५० बसेस उपलब्ध असून ३६ शालेय नियतांद्वारे विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनुसार शालेय फे-यांचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यातील ७ बसेस या मानवविकास मिशन अंतर्गत आहे. आगारातील ३६ शालेय नियतांद्वारे २६८ शालेय फे-या चालविल्या जातात.

काटोल तालुक्यातील विद्यार्थी -विद्यार्थीनींकरिता शालेय वेळा पाहून एस.टी. बसेस चालविण्यात येत आहे. तथापि, वेळोवेळी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांची मागणी विचारात घेता आवश्यक त्या मार्गांवर फे-यांची संख्या वाढविण्यात आली आहे.

---

## राज्यमार्ग परिवहन महामंडळाचे राज्य शासनामध्ये विलिनीकरण करण्याच्या मागणीबाबत

**(१२) ५२००४ (१९-०१-२०२३). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी गतवर्षी माहे ऑक्टोबर, २०२१ ते माहे मार्च, २०२२ या सहा महिन्यांच्या कालावधीत राज्य परिवहन महामंडळाचे "राज्य शासनात विलनीकरण करण्यात यावे" या मागणीकरीता कर्मचाऱ्यांकडून संप पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे राज्य शासनात विलिनीकरण करुन त्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना शासन सेवेत घेण्यात यावे अशी मागणी केली होती, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) व (४) रा.प.महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण व्हावे या मागणीकरीता दि.२९.१०.२०२१ पासून रा.प.कर्मचाऱ्यांनी कोणताही इशारा न देता अचानकपणे संप सुरु केला. या संपाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन दाखल करण्यात आली होती त्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार दि.०८.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचारी समजण्यात यावे" या मागणीचा विचार करण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

१. रस्ते परिवहन महामंडळ अधिनियम १९५० अन्वये लागू असलेल्या कायदेशीर तरतूदी आणि इतर लागू कायदे, नियम तसेच प्रशासकीय आणि कार्यात्मक बाबींचा विचार करता, महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनात सामावून घेणे शक्य नाही.

२. त्याचप्रमाणे कायदेशीर तरतूदी तसेच प्रशासकीय व कार्यात्मक बाबींचा विचार करता महामंडळाचे कर्मचाऱ्यांसह राज्य शासनामध्ये विलीनीकरण करणे आणि महामंडळाच्या अपेक्षेप्रमाणे प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय शासकीय विभागामार्फत करणे शक्य होणार नाही.

३. महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, राज्य शासनाने अर्थसंकल्पीय तरतूद करून महामंडळाच्या

कर्मचा-यांच्या वेतनासाठी किमान पुढील ४ वर्षांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. महामंडळाच्या आर्थिक कामगिरीचा आढावा घेऊन हे आर्थिक सहाय्य पुढे सुरू ठेवण्याबाबत योग्य वेळी निर्णय घेण्यात यावा.

सदर समितीने केलेल्या वरील शिफारशींनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

---

## मलकापूर (जि. बुलढाणा) येथे एसटी आगाराला बसेस पुरविणेबाबत

**(१३) ५२०४८ (१९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) येथे एसटी आगाराला १०० बसेसची आवश्यकता असतांना प्रत्यक्षात फक्त ४६ बसेस उपलब्ध असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मलकापूर हे विदर्भाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जात असून राज्याच्या विविध भागातून बसेस धावत असून ग्रामीण भागातही एसटी ची मागणी असतांना प्रवाश्यांच्या सोयीसुविधा साठी व एस. टी. महामंडळाचे आर्थिक उत्पन्न व संख्या वाढविण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) मलकापूर आगारात सद्यस्थितीत एकून ५९ बसेस चालनासाठी उपलब्ध असून, ४२ नियते प्रत्यक्ष चालनात आहेत.

(२) व (३) रा.प.महामंडळात ७०० बसेस घेण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून विविध विभागांत बसेसचे टप्प्याटप्प्याने वाटप करण्यात येत आहे. तसेच २००० बसेस घेण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरु असून बसेस प्राप्त होताच विभागांची आवश्यकता व गरजेनुसार बसेसचे वाटप करण्यात येणार आहे.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील आगारामध्ये कालबाहय बसेसने प्रवासी वाहतुक होत असल्याबाबत.

**(१४) ५२०५६ (१९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील बस आगारात नादुरुस्त व कालबाहय झालेल्या बसमधून प्रवासी वाहतूक करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मलकापूर येथील अशाच कालबाहय झालेल्या बसमधील पत्र्यामुळे दोन युवकांचे हात कापल्याची घटना घडली असून अशा बसमधून प्रवासी वाहतूक केल्यास अपघात होण्याची शक्यता आहे हे ही खरे आहे काय,

(३)असल्या, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार उपरोक्त आगारात नवीन बस उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) सदर घटना ज्या बसमुळे घडली ती बस कालबाह्य नव्हती, सदर प्रकरणी बस चालक व वाहक यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली असून प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

रा.प.महामंडळात ७०० बसेस घेण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून विविध विभागास बसेसचे टप्याटप्याने वाटप करण्यात येत आहे. बुलडाणा विभागास २० बसेस देण्यात आल्या असून,त्यापैकी १० बसेसचे मलकापुर आगारास

वर्ग केल्या आहेत. तसेच २००० बसेस घेण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरु असुन बसेस प्राप्त होताच विभागांची आवश्यकता व गरजेनुसार बसेसचे वाटप करण्यात येणार आहे.

---

**राज्य परिवहन महामंडळाने एसटीच्या पुनरुज्जीवन आराखडयाची अंमलबजावणी सुरु केल्याबाबत**

**(१५) ५२५९१ (१९-०१-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने एसटीच्या पुनरुज्जीवन आराखडयाची एसटी गाडीतील प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायी करण्यासह एसटीला आर्थिक तोटयातून बाहेर काढण्याकरिता अंमलबजावणी सुरु केल्याचे माहे नाेव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नांदेड, यवतमाळ, अमरावती जिल्हयातील एसटी गाडयांच्या पुनज्जीवन आराखडयाची अंमलबाजवणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :**(१) होय.

(२) व (३) सन २०२२ - २०२३ मध्ये अद्यापपावेतो राज्य परिवहन नांदेड विभागातील एकूण ३२, यवतमाळ विभागातील २७ व अमरावती विभागातील १४ वाहनांची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. तसेच रा.प. महामंडळाकडुन प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नवीन ७०० वाहने महामंडळाच्या वाहन ताफ्यात सामील करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मध्यवर्ती कार्यशाळेत नवीन तयार ४०० वाहनांपैकी नांदेड विभागात-१०, यवतमाळ विभागात-१०, व अमरावती विभागात-२० वाहने देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. भविष्यात उर्वरित नवीन तयार होणाऱ्या ३०० वाहनापैकी विभागात निहाय वाटपानुसार उपरोक्त विभागाना नवीन वाहने देण्यात येतील.

एसटीच्या पुनरुज्जीवन आराखडयानुसार दिर्घकालीन योजनेअंतर्गत शाश्वत इंधनाचा अवलंब करण्याच्या अनुषंगाने रा.प.महामंडळामध्ये भाडेतत्वावर बसेस घेण्याची प्रक्रिया सुरु असुन विद्युत प्रणालीवर चालणा-या बसेस घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेत नांदेड, यवतमाळ व अमरावती या विभागांचाही समावेश आहे.

मध्यम मुदतीच्या योजनेअंतर्गत वाहनताफा/ बसेसचे बाहय यंत्रणेकडुन चालन यानुसार भाडेतत्वावरील साध्या बसेस घेण्याकरिता विभागांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यामध्ये यवतमाळ व अमरावती विभागांचा समावेश आहे.

---

**उस्मानाबाद जिल्ह्याच्या प्रादेशिक योजनेमधील मंजूर विकास केंद्र व परिघस्त क्षेत्र नकाशातील रहिवाशी विभागामध्ये कोणत्याही प्रकारचे अधिमूल्य न आकारता विकास परवानगी मिळण्याबाबत**

**(१६) ५३००५ (२२-०१-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील मंजूर विकास केंद्र व परिघस्त क्षेत्र नकाशातील रहिवाशी विभागामध्ये विकास परवानगीकरीता वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दरानुसार जमिनीच्या मुल्यांकनाच्या १५ टक्के अधिमुल्य शुल्क आकारण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील केवळ काहीच जिल्ह्यात अशाप्रकारे अधिमुल्य शुल्क आकारले जात असून उर्वरीत जिल्ह्याकरिता अशाप्रकारे अधिमुल्य शुल्क आकारले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील इतर जिल्ह्याप्रमाणेच उस्मानाबाद जिल्ह्याच्या प्रादेशिक योजनेमधील मंजूर विकास केंद्र व परिघस्त क्षेत्र नकाशातील रहिवाशी विभागामध्ये कोणत्याही प्रकारचे अधिमुल्य न आकारता विकास परवानगी मिळावी अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगरविकास मंत्री महोदयांकडे दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दि.०१.०१.२०१८ अन्वये, औरंगाबाद विभागांतर्गत द्रुतगती पध्दतीने तयार करण्यात आलेल्या, बीड, परभणी, हिंगोली व उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या प्रादेशिक योजनाचा मंजूर विकास केंद्र व परिघस्त नकाशामध्ये रहिवास विभागामध्ये अभिन्यास मंजूर करताना १५% अधिमुल्य आकारणीची तरतुद आहे. मात्र, उक्त निर्णयापूर्वी मंजूर झालेल्या व अमलात आलेल्या, औरंगाबाद, जालना, नांदेड व लातूर या जिल्ह्यांच्या प्रादेशिक योजनाचा मंजूर विकास केंद्र व परिघस्त नकाशामध्ये रहिवास विभागामध्ये अभिन्यास मंजूर करताना १५% अधिमुल्य आकारणीची तरतुद नाही.

राज्यातील द्रुतगती पध्दतीने ११ प्रदेशामध्ये मंजूर प्रादेशिक योजनेच्या तरतूदीनुसार परिघस्त क्षेत्र / विकास केंद्राचे संपूर्ण क्षेत्र प्रथमत: शेती विभागात समाविष्ठ होते. त्यामुळे अशा क्षेत्रापैकी, मंजूर प्रादेशिक योजनेच्या तरतूदीनुसार गावठाणापासून विवक्षित अंतरात अधिमूल्य आकारणीसापेक्ष रहिवास व तत्सम विकास अनुज्ञेय होत असल्याने, अशा ११ प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रात विकास केंद्र / परिघस्त क्षेत्र नकाशामध्ये रहिवास विभागात समाविष्ट क्षेत्राकरिता ज्याप्रमाणे गावठाणापासून विवक्षित अंतरात अधिमूल्य आकारणी करणेसापेक्ष रहिवास वापर अनुज्ञेय करण्यात येतो, त्याप्रमाणे प्रादेशिक योजना मंजूरीनंतर मंजूर झालेल्या विकास केंद्राच्या परिसराच्या नकाशामधील रहिवास विभागामध्ये अधिमूल्य आकारण्यात येते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर ११ प्रदेशांमध्ये मंजूर प्रादेशिक योजनेच्या तरतुदीनुसार परिघस्त क्षेत्र/विकास केंद्राचे संपूर्ण क्षेत्र प्रथमत: शेती विभागात समाविष्ट होते. त्यामुळे अशा क्षेत्रापैकी, मंजूर प्रादेशिक योजनेच्या तरतुदीनुसार गावठाणापासून विवक्षित अंतरात अधिमूल्य आकारणीसापेक्ष रहिवास व तत्सम विकास अनुज्ञेय होत असल्याने, अशा ११ प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रात विकास केंद्र/परिघस्त क्षेत्र नकाशामध्ये रहिवास विभागात समाविष्ट क्षेत्राकरीता, ज्याप्रमाणे गावठाणापासून विवक्षित अंतरात अधिमूल्य आकारणी करणेसापेक्ष रहिवास वापर अनुज्ञेय करण्यात येतो, त्याप्रमाणे प्रादेशिक योजना मंजूरीनंतर मंजूर झालेल्या विकास केंद्राच्या परिसराच्या नकाशामधील रहिवास विभागामध्ये अधिमूल्य आकारण्यात येते. किंबहुना सदर वापर विभाग फक्त रहिवास नसून "Residential Zone with Payment of Premium" असा मंजूर केलेला आहे. सबब, या ११ प्रादेशिक योजनेच्या मंजूरीनंतर संचालनालयाकडून मंजूर केलेल्या विकास केंद्राच्या/परिघस्त क्षेत्राच्या नकाशांमधील रहिवास विभागात "Residential Zone with Payment of Premium" समाविष्ट जमिनींच्या विकासामध्ये अधिमूल्य आकारणी संदर्भाने घेतलेला निर्णय योग्य व वाजवी असल्याबाबत मा.विधानसभा सदस्य यांना दि.१५.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन मंडळाच्या चंदगड आगार (जि.कोल्हापूर) येथे प्रवाशांच्या सोयीकरिता आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करणेबाबत

**(१७) ५३३९४ (१९-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड आगार (जि.कोल्हापूर) येथे सध्या एकूण ४४ बसेस असून यातील १० बसेस सुस्थितीत असून इतर नादुरुस्त बसने लांब पल्ल्याच्या ठिकाणी जावयाचे झाल्यास प्रवाश्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदगड आगार येथे २७ वाहक, २१ चालक व १० मेकॅनिक पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांच्यावर चंदगड आगाराचा कार्यभार सुरु असल्याने या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्यामुळे रिक्त पदे तातडीने भरण्यांत यावीत अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रवाशी जनतेने शासनाकडे माहे जून, २०२२ पासून निवेदने देऊन केली आहे,हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाच्या एस.टी.बसेसच्या तुलनेत कर्नाटक शासनाच्या NWKRTC च्या माध्यमातून असणाऱ्या बसेस अधिक चांगल्या व सुस्थितीत असल्याने राज्यातील प्रवाशी त्या राज्याच्या बसेसकडे आकर्षित होत असल्यामुळे राज्याच्या महसुलावर त्याचा परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेला चंदगड तालुका लक्षांत घेतां, तेथे सुस्थितीत बसेस देण्याबाबत तसेंच चंदगड आगारातील रिक्त असलेली पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१),(२) व (३) नाही.

कोल्हापूर विभागातील चंदगड आगारात एकूण ४५ बसेस असून सर्व बसेस सुस्थितीत आहेत.

(४) व (५) सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदामध्ये अंतिम वाहन चालन चाचणी उत्तीर्ण होऊन निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूका देण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु करण्यात आलेली आहे.

---

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जातीचा नागरी वस्त्यांमध्ये लाभ देण्याबाबत

**(१८) ५३९८५ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या नागरी वस्त्यांमध्ये विकास कामे करताना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी नागरी वसाहती अथवा प्रभागांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ५१% असली पाहिजे अशी अट आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ज्या नागरी वसाहतीमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४६%, ४८%, ४९% असते अशा वसाहतींना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन ज्या ठिकाणी ४०% अनुसूचित जातीची लोकसंख्या असेल अशा नागरी वसाहती अथवा प्रभागांमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करणार आहे काय ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या जिल्हास्तरीय योजनेचे मार्गदर्शक तत्वे नगर विकास विभाग, शा.नि.दिनांक ०५ मार्च, २००२ अन्वये तसेच तद्नंतर वेळोवेळी विहित करण्यात आले आहेत.

• त्यानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नव बौध्दांसाठी ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या जेथे तुलनेने अधिक आहे तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेचा लाभ देण्यात येतो.

---

## सोनगीर (ता. धुळे) येथे नवीन बस स्थानकाची निर्मिती करण्याबाबत

**(१९) ५४६६४ (२२-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगीर (ता. धुळे) हे गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांना जोडणाऱ्या दोन महत्त्वपूर्ण मार्गावर वसलेले सुमारे २५ हजार लोकसंख्येचे गाव असून या ठिकाणी नवीन बसस्थानक निर्माण व्हावे, अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनगीर येथे नवीन बस स्थानकाची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मागणी लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

ग्रामपंचायत कार्यालय,सोनगीर ता.जि.धुळे यांनी सोनगीर गावठाण हद्दीतील गट नं.६५ येथे बसस्थानकासाठी जागा आरक्षित करुन,सदर बाबत ग्रामसभेत ठराव करुन प्रस्ताव विभाग नियंत्रक रा.प.धुळे यांना पाठविला आहे. प्राप्त प्रस्तावावर मध्यवर्ती कार्यालयामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यात अनुसूचित जाती, नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी निवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(२०) ५४८३७ (१८-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती, नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी जवळपास १९ वर्षापासून अनुसूचित जातीसाठी वर्गवारी केलेल्या १६५ निवासी, आश्रम शाळा पात्र ठरल्या असून या आश्रम शाळांना नियमितपणे आर्थिक सहाय्य, अनुदान न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम होत आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, राज्यातील निवासी आश्रमशाळांना सन २०१९ पासून ते आतापर्यंत अनुदान वितरित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून निवासी आश्रम शाळांना तातडीने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :**(१),(२) व (३) शासन निर्णय, दिनांक ८ मार्च,२०१९ अन्वये शाहू,फुले,आंबेडकर निवासी/ अनिवासी शाळा योजनेंतर्गत तपासणीच्या अधीन राहून पात्र आश्रमशाळांना २० % प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, त्यानुषंगाने सदर आश्रमशाळांना नियमानुसार अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानदेशातील शेतकऱ्यांच्या फळ पिकांसह शेतीमालाला**
**बाजारात योग्य भाव मिळण्याबाबत**

**(२१) ५६५७२ (१३-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानदेशातील नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पपई व केळी या फळपिकाची फारच कमी भावात विक्री करावी लागत असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार सदर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या फळ पिकांसह शेतीमालाला बाजारात योग्य भाव मिळण्यासाठी शासनाने योग्य त्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,

नंदूरबार जिल्ह्यात एकूण ६ कृषि उत्पन्न बाजार समित्या असून, पपई व केळी या फळपिकाच्या आवकेबाबत ६ बाजार समित्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, सदर बाजार समित्यांच्या परिसरात पपई व केळी फळपिकांची विक्री होत नाही. काही कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या क्षेत्रात पपई व केळी या फळपिकांची अत्यल्प प्रमाणात लागवड होते. मात्र, तेथील उत्पादित मालाची विक्री परस्पर होत असल्यामुळे, बाजार समित्यांकडे त्यांची आवक होत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे रसलपूर, (ता.निफाड, जि.नाशिक) येथील बंधाऱ्यांच्या कामास**
**प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२२) ५६६६५ (२६-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत कॉ.प.बंधारा रसलपूर, (ता.निफाड,जि.नाशिक) या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केल्याचे निदर्शनास आहे आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावास शासनाने अद्यापही मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने बंधाऱ्यांच्या कामास मंजुरी व निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, निधी उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधी मागणी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रादेशिक परिवहन अधिकारी,गडचिरोली यांचेकडे प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्याबाबत**

**(२३) ५७१०२ (२६-०४-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृह (परिवहन) विभागाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली यांचेकडे दिनांक १२ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली हा आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त जिल्हा असून या जिल्ह्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना अन्य कोणत्याही जिल्ह्यातील कोणत्याही पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येवू नये असा शासनाने दिनांक २२ नोव्हेंबर २०१० रोजी निर्णय घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये शासन धोरणाला विरोध दर्शविल्याने शासनाने त्यानुंषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) : (१)** होय,
तथापि, शासन पत्र दि. २४ मे, २०२३ अन्वये सदर अतिरिक्त कार्यभार संपुष्टात आणलेला आहे.
(२) व (३) दिनांक २२ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या असल्या तरी, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि. ०५ सप्टेंबर, २०१८ अन्वये अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत, त्याप्रमाणे सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कापूस निर्यातीला साखर निर्यातीच्या धर्तीवर अनुदान देण्याबाबत

**(२४) ५७३२० (२१-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व विशेषतः पश्चिम विदर्भात अमरावती, यवतमाळ, वाशीम, अकोला व बुलढाणा या भागात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होत असून कापसाला अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कापूस उत्पादकांना दिलासा देण्यासाठी साखरे प्रमाणेच कापसासाठी नियमित असे निर्यात धोरण आखण्याची गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेवून साखरेच्या धर्तीवर कापूस निर्यातीवर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) कापूस हंगाम २०२२-२३ करीता केंद्र शासनाने लांब धाग्याच्या कापसासाठी रु.६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु.६०८०/- प्रति क्विंटल इतका हमी दर जाहिर केलेला आहे. हंगामाच्या सुरूवातीला कापसास खुल्या बाजारात रु.९,५००/-प्रति क्विंटल इतका दर प्राप्त होत होता तर सध्या खुल्या बाजारपेठेत गुणवत्तेनुसार कापसाचे दर प्रति क्विंटल रु.७,४५०/- ते रु.७,७००/- इतके आहेत.
(२)व (३) निर्यातीबाबतचे धोरण OGL (Open General License) अंतर्गत केंद्र शासनाकडून ठरविले जात असल्याने याबाबत राज्य शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गंगापूर रोडवरील खाया जातीची झाडे तोडण्यात आल्याबाबत

**(२५) ५७३२९ (२४-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गंगापूर रोडवरील खाया जातीची झाडे दिनांक २ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास तोडण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झाडे तोडतांना झाडांवरील १८ बगळयांचा बळी जाऊन अन्य १५ बगळे गंभीररित्या जखमी झाल्याचे त्यावेळी निदर्शनास आले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, परंतु, झाडे तोडण्यासाठी संबंधित ठेकेदारांने महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी वन विभागाने पोलिसात गुन्हा दाखल केलेला असला तरी महानगरपालिकेने त्याबाबत कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे व महापालिकेची या स्वरुपाची कामे ही एकाच ठेकेदारांमार्फत करण्यांत येत असल्याचेही त्याचवेळी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, सदर ठिकाणी झालेली वृक्ष छाटणी ही मक्तेदराने दि. ०१.०८.२०२१ रोजी परस्पर केली असून, नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी याबाबत कोणतेही आदेश / सूचना केली नव्हती
(२) सदर ठिकाणी झालेल्या वृक्ष छाटणीत १८ बगळयांचा जागीच मृत्यु झाला व १५ बगळे गंभीर जखमी झाले आहेत.
(३) होय हे खरे आहे.
(४) व (५) उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, नाशिक पश्चिम विभाग यांचेकडून दि.०३.०८.२०२१ रोजी संबंधित मक्तेदार यांना अनधिकृतरित्या वृक्ष छाटल्याबाबत नोटीस बजावण्यात आली. दि.१३.०८.२०२१ रोजी मक्तेदार यांचेकडून नोटीसीस प्राप्त खुलासा समाधानकारक नसल्याने, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ८ कलम २१ (१) अन्वये दि. १६.०९.२०२१ रोजी मक्तेदार यांचे विरुध्द गंगापूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु. ५.०० लक्ष जप्त करून दि. २३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मक्तेदार यांना काळया यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या घंटागाडीचा ठेका संपुष्टात आल्यानंतर सातत्याने त्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिल्याबाबत

**(२६) ५७४१७ (२४-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या घंटागाडीचा ठेका संपूष्टात आल्यानंतर सातत्याने या ठेक्याला मुदतवाढ दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील वर्षीचा ठेका १७६ कोटी रुपयांना ठेकेदारांना दिला गेलेला असतांना पुढील ५ वर्षासाठी हा ठेका ३५४ कोटी रुपयांना दिला गेल्यामुळे तेथील नागरीकांच्या मनात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) केरकचरा संकलन व वाहतुक कामी नव्याने प्रस्तावित केलेली निविदा प्रकिया अंतिम होऊन कार्यादेश देणेस अवधी लागण्याची शक्यता तसेच, दैनंदिन केरकचरा उचलणे व त्याची वाहतूक करणे नागरीकांच्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक बाब असल्याने सदर कामास महानगरपालिकेतर्फे मुदतवाढ देणेत आली आहे.

तसेच, नाशिक शहराची वाढती लोकसंख्या घंटागाडी वाहनांची वाढीव संख्या, दरडोई कचरा निर्मीती, केरकचरा संकलन व वाहतूक, घंटागाडी कामगारांचे वेतन, घंटागाडी इंधनखर्च, भाववाढ इत्यादी बाबींचा विचार करता भाववाढीनुसार जुन्या ठेक्याच्या तुलनेत नवीन ठेक्याची रक्कम वाढल्याचे आयुक्त यांनी नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत परिवहन सेवा सुरु करण्याबाबत**

**(२७) ५७४६७ (२४-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत परिवहन सेवा सुरु करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याच्या लेखी सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुचनांच्या अनुषंगाने अंबरनाथ शहरात परिवहन सेवा सुरू करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अंबरनाथ शहरातील परिवहन सेवा सुधारण्याच्या दृष्टीने एमयुटीपी ३ अ प्रकल्पांतर्गत कल्याण ते बदलापूर रेल्वेच्या उपनगरीय रेल्वे दरम्यान तिसरी व चौथी मार्गिका प्रस्तावित आहे. तसेच प्राधिकरणामार्फत अंबरनाथ उपनगरीय रेल्वे स्थानकाचा SATIS अंतर्गत सुधारणा करण्यासाठी अभ्यास प्रगतीपथावर आहे. अंबरनाथ शहरात परिवहन सेवा सुरु करण्यासाठी प्राधिकरणांतर्गत सुसाध्यता तपासण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**बेलोरा (जि.अमरावती) येथील विमानतळाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ५७७३९ (२५-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलोरा (जि.अमरावती) येथील विमानतळाचा विस्तार व विकासकामांसाठी सन २००९ मध्ये शासन निर्णय निर्गमित करून मान्यता देण्यात आलेली असून सन २०१७ पासून विमानतळाच्या कामाला सुरवात झाली असून संरक्षक भिंत व धावपट्टीची कामे अंतिम टप्प्यात असल्याचे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विमानतळाचा महत्वाचा भाग असणारी प्रशासकीय इमारत, टर्मिनल बिल्डिंग, एटीस टॉवर , फायर स्टेशनच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने विमानतळाचे उर्वरित बांधकाम जलदगतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
संरक्षक भिंतीचे काम माहे सप्टेंबर,२०२२ ला व धावपट्टीचे काम माहे जानेवारी,२०२३ ला पूर्ण झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
टर्मिनल बिल्डींग, एटीएस टॉवर, फायर स्टेशनच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन दिनांक १८/१/२०२३ रोजी या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. काम प्रगतीपथावर आहे.

(३) संरक्षक भिंतीचे व धावपट्टीचे काम पूर्ण झालेले असून टर्मिनल बिल्डींग, एटीएस टॉवर, फायर स्टेशनचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयात वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) ५८४०८ (२६-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात सन २०२२ मध्ये सुमारे ४०० पेक्षा अधिक नागरीकांनी रस्ते अपघातात जीव गमावला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्यांचा मृत्यूचा आकडा सर्वाधिक २४२ असून त्यानंतर पादचारी-५९, कार, टॅक्सी-२४, ट्रकलॉरी-१५, सायकलस्वार-१४, ऑटोरिक्षा-०४, बस-०१ व इतर वाहने-१० असे एकूण ४०० जणांनी रस्ते अपघातात जीव गमावल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्हयाचा रस्ते अपघातांमध्ये ६० टक्यांपेक्षा जास्त मृत्यू हे विना हेल्मेट वाहन चालविणारे दुचाकीस्वार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱे व वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :** (१) होय.
(२) जानेवारी - २०२२ ते डिसेंबर - २०२२ पर्यंत मृतांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वाहन | मृतांची आकडेवारी |
|---|---|
| दुचाकी | २४२ |
| पादचारी | ६९ |
| कार / टॅक्सी | २८ |
| ट्रकलॉरी | १७ |
| सायकलस्वार | १९ |
| ऑटोरिक्षा | ५ |
| बस | २ |
| इतर | १४ |
| एकूण | ३९६ |

(३) जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत पोलीस विभागाकडून माहिती घेऊन अपघात विश्लेषण केले असता दि.०१.०१.२०२२ ते ३१.१२.२०२२ दरम्यान एकूण अपघातातील मृत्युपैकी ६०% पेक्षा जास्त अपघाती मृत्यु दुचाकी वाहनचालकांचे आहे.
(४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर यांनी अपघातांचे विश्लेषण केले असून जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या माध्यमातून सर्व शासकीय यंत्रणेमार्फत जनजागृती व वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातनोशी (ता.भोर जि.पुणे) येथील रामबाग ओढयावर तीन उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(३०) ५९१७४ (२६-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातनोशी (ता.भोर जि.पुणे) येथील रामबाग ओढयावर तीन उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून विशेष बाब म्हणून प्रशासकिय मंजूरी देणेबाबत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालक मंत्री, पुणे यांना दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपसा जलसिंचन योजनेसाठी नाविन्यपूर्ण योजनेतून विशेष बाब म्हणून प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मागणी करण्यात आलेल्या तीन उपसा जलसिंचन पैकी उपसा सिंचन योजना अनंतगंगा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. हातनोशी हे काम जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत मंजूर असल्यामुळे सदर कामास दि.२९.१२.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माहिती अधिकारी कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३१) ५९३५९ (१०-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माहिती अधिकारी कार्यालयातील अनेक पदे मागील काही वर्षापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयासाठी नियुक्त करण्यात आलेले अनेक कर्मचारी सदर कार्यालयात काम न करता कोल्हापूर, मुंबई इत्यादी ठिकाणी कार्यरत असून पगार सिंधुदुर्गातून मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार रिक्त पदे भरुन नियुक्तीच्या ठिकाणी काम न करता इतरत्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रशासकीय कारणास्तव महासंचालनालयातंर्गत एका कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार अन्य कार्यालयात घेतल्या जातात. जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग या कार्यालयातील वरिष्ठ लिपिक कर्मचारी यांच्या सेवा प्रशासकीय कामाकरिता दि.१२.०९.२०१८ च्या आदेशान्वये मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आल्या आहेत. तसेच तेथील कामकाजाच्या सोयीसाठी जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर येथील वरिष्ठ लिपिक कर्मचारी यांची सेवा जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(३) प्रशासकीय कारणास्तव कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत. सबब, चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे धरणाच्या निर्मितीला विलंब होत असल्याबाबत

**(३२) ५९५५१ (२८-०४-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खालापूर येथील रेल्वे लाईन पट्ट्यातील नावंढे, केळवली, वांगणी, वणी, बीड, जांबरुंग, खरवई, डोलवली आदि १५ गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी दूर व्हावी, याकरीता दिनांक २ फेब्रुवारी, १९८० रोजी वा त्यासुमारास जांबरुंग धरण बांधण्याचा निर्णय घेण्यात येऊन या धरणामुळे त्या परिसरातील १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती, हे खरे आहे, काय,

(२) असल्यास, जांबरुंग धरणासाठी शासनाने मंजुरी दिली त्यावेळी रुपये ४९ लाख २० हजारांची आर्थिक तरतूद शासनाने केली असून धरण प्रकल्प योजना ४२ वर्षे प्रलंबित असल्याने त्याचा खर्च जवळपास रुपये ६० कोटींच्या घरात गेला असून शासनाच्या आर्थिक खर्चात तब्बल ९० पटीने भर पडणार आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिक काळ होऊनही धरणाचे काम सुरु न झाल्याने १५ गावांना उन्हाळयात पाणी टंचाईला भासत असल्याने शेतजमिनी, पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त धरण कामासाठी दोन वर्षापूर्वी, नव्याने ४८ कोटींचा प्रस्ताव मंजूर होऊनही अद्यापर्यंत कामास सुरुवात करण्यात आले नसल्याचे असे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने उक्त गावाची पाणी टंचाई दूर करण्यासाठी धरणाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

या योजनेस रु.५९.२१ लक्ष इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता पाटबंधारे विभागाकडून दि.०२/०२/१९८० रोजी प्राप्त झालेली असून सदर योजना या विभागास डिसेंबर,१९९३ रोजी हस्तांतरीत झालेली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर योजनेस मूळ प्रशासकीय मान्यता रु.५९.२१ लक्ष दि.०२/०२/१९८० रोजी प्राप्त झालेली असून सदर प्रकल्पास वनसंज्ञा लागू होती. सदर योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून सन २०११ मध्ये रु.१८३३.५५ लक्ष इतक्या रकमेस सुप्रमा झालेली आहे. वन सर्वेक्षण कायदा, १९८० अन्वये केंद्र शासन वन व पर्यावरण विभाग, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर वन जमिनीचा ताबा दि.२०/०५/२०१९ रोजी मिळाला आहे. सद्यस्थितीत रोदोचर, खोदकाम, बाजू भराव, कवच भराव इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत. सदर धरणाचे काम युध्द पातळीवर करून २ वर्षामध्ये योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### एस.टी.महामंडळाला आर्थीक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी हकीम समिती नेमण्याबाबत

**(३३) ५९७०९ (२२-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक अडचणीत असलेल्या एस.टी.महामंडळ कर्मचा-यांच्या संपानंतर आर्थिक गर्तेत असल्याने एस.टी.ला तोटयातून बाहेर काढण्यासाठी शासनाने हकीम समिती नेमल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हकीम समितीचा अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (जि.नाशिक) शहरातील बसस्थानकात महिलांच्या स्वच्छतागृहांची झालेली दूरवस्था

**(३४) ५९७७६ (२६-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात नवीन व जुने अशी दोन बसस्थानके असून जुन्या बसस्थानकात महिलांकरिता असलेल्या स्वच्छतागृहाची दूरवस्था झाली असून तेथे अस्वच्छता असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच महिलांकरिता असलेल्या स्वच्छतागृहात महिलांकडून सक्तीने पैशाची वसुली केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पैशाची वसुली नेमकी कोणाकडून केली जात आहे व शुल्क आकारले जात असल्याबाबत कोणताही फलक व पावती दिली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१),(२) नाही.
(३), (४) व (५) मालेगाव जुने बसस्थानकावरील प्रसाधनगृहाचे प्रचलन दिपस्तंभ बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, मालेगाव यांच्याकडून करण्यात येत असून, प्रसाधनगृह प्रचलन करण्यासाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे दर आकारणी व महिला व १२ वर्षांआतील मुलांसाठी मोफत प्रसाधनगृह वापर असल्याबाबतचे दरपत्रक दर्शनी भागात लावले आहे. प्रसाधनगृह परिचालन करण्याकरिता नेमण्यात आलेल्या संस्थेकडून महिलाप्रवांशाकडून पैशांची वसूली केली जात नाही.

---

### मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक मध्ये नागरिक मुलभूत सुविधापासून वंचित असल्याबाबत

**(३५) ५९७७७ (२२-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक मध्ये संमिश्र लोकवस्ती असलेल्या भागातील नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भागातील गटार, अरुंद रस्ते, उद्यानाची दूरवस्था, गटारांवरील वाढीव अतिक्रमणे, सार्वजनिक शौचालयाची दूरवस्था, वाहतुक कोंडी, सार्वजनिक ठिकाणावरील पथदिप बंद असणे आदि मुलभूत बाबींकडे महानगरपालिकेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधित विभागाचे लक्ष वेधूनही त्यांच्याकडून कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुलभूत सोयी-सुविधेच्या प्रतिक्षेत असलेल्या संमिश्र लोकवस्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) व (२) मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक एक मध्ये शासनाचे विविध योजनांतर्गत व महानगरपालिका निधीतील मंजूर विकास कामे प्रगतीत असून प्रस्तावित आहेत. मालेगाव महानगरपालिकेव्दारे सदर भागात रस्ते, गटार, उद्यान, पाणी पुरवठा या सारख्या मुलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

याशिवाय काही प्रमाणात खराब झालेले रस्ते, गटार यासारख्या सुविधा पुन्हा नव्याने करण्यात येतात. वेळोवेळी सदर भागात सर्वेक्षण करून ज्या काही ठिकाणी पायाभूत सुविधा नसतील अथवा खराब झालेल्या आहेत, अशा ठिकाणी नविन सुविधा प्रस्तावित करण्यात येतात.
(३) हे खरे नाही. लोकप्रतिनिधी अथवा नागरीकांचे शिष्टमंडळ महानगरपालिकेकडे आलेले नाही.
(४) प्रभाग क्रमांक १ मध्ये शासनाचे विविध योजनांतर्गत व महानगरपालिका निधीतील मंजूर विकास कामे प्रगतीत असून प्रस्तावित आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी यांच्या खाजगी रुग्णालयात अनधिकृत सोनाग्राफी मशीन आढळल्याबाबत

**(३६) ५९८५० (२२-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असताना श्री बालाजी रुग्णालय हे खाजगी रुग्णालय चालवत असून त्यांच्या रुग्णालयात अनाधिकृत सोनोग्राफी मशीन आढळली असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीसीएनडीटी कायद्यांतर्गत कोणतेही मशिन रुग्णालयात सुरु करण्याआधी किंवा बाळगण्यासाठी महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाची परवानगी आवश्यक असतांना देखील श्री बालाजी रुग्णालयाने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर वैद्यकीय अधिकारी यांच्यासह अकरा जणांवर नाशिक रोड न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय सेवेत असतांना खाजगी रुग्णालय चालवत असल्याप्रकरणी त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :**(१) (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द मे. ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ नाशिक रोड येथील न्यायालयात दि. ०९.०१.२०२३ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली असून, जे.एफ.एम.सी. न्यायालयात दावा क्र. ५/२०२३ असा असून, प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

त्याचबरोबर महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरंदर (जि. पुणे) येथील विमानतळ उभारणीच्या प्रस्ताबाबाबत

**(३७) ६०१२३ (२५-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि. पुणे) येथील विमानतळ उभारणीबाबत एमएडीसीकडून राज्य शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दि. १२.०२.२०१८ रोजी प्रस्ताव शासनास सादर केला होता.

(२) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावास मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील शक्तीप्रदत्त समितीच्या दि. ०६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आणि पुरंदर जि. पुणे येथील प्रस्तावित विमानतळाच्या भूसंपादनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्याचा शासन निर्णय दि. ०९.०५.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

तथापि, दि. २९.०८.२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वॉर रुम बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत साईट १ अ जवळ एक लॉजिस्टिक पार्क उभारण्यात येणे प्रस्तावित असून त्यामध्येच नवीन विमानतळ प्रकल्पाचाही समावेश असेल. हा प्रकल्प खाजगी- सार्वजनिक सहभाग तत्त्वावर करण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने विमानतळाच्या सुमारे २८०० हे. क्षेत्रावरील विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून उपलब्ध माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दि. २७.०९.२०२२ रोजी हस्तांतरित केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय सेवेत कार्यरत गट अ व ब पदाच्या अधिकारी यांच्या नियुक्ती व बदलीसाठी पती पत्नी एकत्रीकरण व आपआपसात बदलीस मान्यता मिळण्याबाबत

**(३८) ६०८०८ (२६-०४-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासकीय गट "अ" व गट "ब "(राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मध्ये सुधारणा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांनी माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये करून ही अद्याप सुधारणा करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभाग वाटप नियम २०१५ मध्ये सेवानिवृत्ती तीन वर्ष शिल्लक असलेल्या अधिकाऱ्यांना महसूल विभाग वाटपातून वगळण्यात आले होते तसेच पती-पत्नी एकत्रीकरणासंदर्भात पद रिक्त असल्यास वाटप केलेल्या महसूली विभागाऐवजी मागितलेला महसूल विभाग बदलून मिळण्याची तरतूद होती, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासाठी केंद्र, राज्य शासकीय- नियम शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा (शासकीय शैक्षणिक संस्थांमध्ये शासकीय अनुदानित खाजगी शिक्षण संस्था वगळून) कार्यरत असणारे पती-पत्नी पात्र होते, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मध्ये महसूल विभाग बदलून मिळणेबाबतची तरतूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय सेवेत कार्यरत पती-पत्नी एकत्रित ठेवण्याच्या धोरणानुसार सन २०२१ च्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करून पूर्वीच्या महसूल विभाग वाटप नियम २०१५ प्रमाणे तरतूद करण्यात येणार काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) होय, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या दि.२६.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अशी मागणी करण्यात आली आहे.
(२) (३) व (४) होय,
(५) राज्य शासकीय सेवेत असलेल्या पती-पत्नींना प्रदीर्घ काळ एकमेकांपासून दूर राहावे लागू नये, यास्तव सन २०१५च्या महसूल विभाग वाटप नियमाद्वारे विहित केलेल्या एका महसूली विभागात व्यतित करावयाच्या प्रदीर्घ कालावधीऐवजी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ अन्वये हा कालावधी अत्यल्प करण्यात आला असून त्याद्वारे कौटुंबिक अडचणींवर उपाययोजना करण्यात आली आहे. त्यामुळे पती-पत्नी एकत्रीकरणाची तरतूद पुन्हा अंतर्भूत करण्याची आवश्यकता राहिलेली नाही.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृदू व जलसंधारण विभागात सुरु असणाऱ्या गैरव्यवहारास आळा घालणेबाबत

**(३९) ६०८११ (२५-०४-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मृदु व जलसंधारण विभागाच्या नागपूर कार्यालयाने १२९ जलसंधारण बांधकामे केवळ ३२ कामात एकत्रित करून १७६ कोटी रुपये किंमतीचे तर औरंगाबाद कार्यालयाने ५८ जलसंधारण कामे केवळ २० कामात एकत्रित करून ६० कोटी २३ लक्ष रुपयाच्या निविदा जाहिर केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एकत्रित काढलेल्या निविदेमुळे शासकीय नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर संस्था मजूर संघटना कंत्राटदार मोठ्या प्रमाणात बेरोजगार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृद व जलसंधारण विभाग प्र.क्र. १४३ जल.३ दिनांक ८ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही कामे रद्द करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत दिनांक ८ जुलै २०२२ रोजी काढलेला अध्यादेश अद्याप शासनाने रद्द न केल्याने या कामाची स्थगिती बेकायदेशीर ठरते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलसंधारण विभागातील कारभार पारदर्शक होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक २७.०९.२०१८ अन्वये रुपये ३० लक्ष किंमतीपर्यंतच्या कामांचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात करण्यात यावे असे निदेश आहेत. या विभागांतर्गत जाहिर केलेल्या निविदांमधील योजनांच्या प्रशासकीय मान्यता रक्कम हि रुपये ३० लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे सदर कामे हि मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकरीता राखीव ठेवण्यात आली नाहीत.

(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत माहे मे व जून २०२२ या कालावधीत ४३२२ योजनांना रु. ६१८९.४१ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. शासन निर्णय दिनांक ८ जुलै,२०२२ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील निविदा प्रक्रियेच्या सर्व स्तरावरील सर्व कामांच्या फक्त निविदा रद्द करण्यात आल्या होत्या, कामे रद्द करण्यात आलेली नाहीत.
(४) सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आलेल्या नसून दिनांक ८ जुलै, २०२२ रोजीच्या अध्यादेशात सुधार करुन शासन निर्णय क्र.मजम-२०२३/प्रक्र. ७/जल-३,दि.११ जानेवारी,२०२३ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळ /कार्यकारी समितीच्या मान्यतेने अंतीम करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) दिनांक ०९ जानेवारी, २०२३ रोजी संपन्न झालेल्या ६३ व्या संचालक मंडळाच्या बैठकीतील निविदा एकत्रिकरण मुद्याच्या अनुषंगाने भविष्यात हाती घ्यावयाच्या कामांच्या एकत्रिकरणाबाबत महामंडळाने करावयाच्या कार्यवाहीचे निदेश प्राप्त आहेत. त्याअनुषंगाने भविष्यात हाती घ्यावयाच्या कामांबाबत उचित कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा मोरांगणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील लघु पाटबंधारे तलावाचे व कॅनलचे काम प्रलंबित असल्याबाबत.

**(४०) ६०८४४ (२६-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा मोरांगणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील लघु पाटबंधारे तलावास सन २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, (लघु पाटबंधारे) ल.पा.तलावाच्या कामास मागील १० वर्षापासून सुरूवात झाली असून अजूनपर्यंत तलावाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्याकरिता कॅनलचे बांधकामाकरिता व शेतकऱ्याच्या जमीनीचा वाढीव मोबदला तातडीने मिळण्याकरिता लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने तलावाचे व कॅनलचे काम पूर्ण करून शेतकऱ्याच्या जमीनीचा वाढीव मोबदला तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
मौ.मोरांगणा, ता.आर्वी, जि.वर्धा या ल.पा. (लघु पाटबंधारे) तलावाला महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून दिनांक १४.११.२००८ ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम एप्रिल,२०१० ला सुरु झाले असून त्यावर रु.४८२.८५ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर तलावाच्या बुडीत क्षेत्राकरीता ०९ भूधारकांचा मा.न्यायालयाच्या आदेशानुसार रु.९२.२७ लक्ष चा वाढीव मोबदल्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाच्या कालवे प्रणालीकरीता सरेखा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सुधारीत अंदापत्रकामध्ये रु.१,८६,७५,०००/- प्रस्तावित करण्यात आलेले आहे. कालवे सरेखा मंजूर झाल्यानंतर भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

### चामोर्शी (जि.गडचिरोली) येथील बसस्थानकाच्या बांधकामास मंजूरी मिळण्याबाबत

**(४१) ६१८२४ (२४-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) येथील बसस्थानकाच्या बांधकामासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकाच्या बांधकामासाठी परिवहन विभागाने जागाही अधिग्रहीत केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामासाठी आवश्यक नकाशे मंजुरीसाठी परिवहन विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बांधकामासाठी अजूनपर्यंत त्या नकाशांना मंजुरी न मिळाल्याने बसस्थानकाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार चामोर्शी बस स्थानकाच्या बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

(४), (५) व (६) रा.प.महामंडळाच्या दि.०४.१०.२०२२ रोजीच्या पत्रानुसार बसस्थानकांच्या आराखडयांना मंजूरी देण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता रा.प. नागपूर प्रदेश मार्फत, चामोर्शी बसस्थानक बांधकामाकरीता, ई-निविदा सुचना क्र.१२ सन २०२२-२३ नुसार ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामाकरीता सन २०२१-२२ मध्ये रु.३.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे पात्र झालेल्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांची फेलोशिप प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ६२३८८ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे पात्र झालेल्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर करावी या मागणीसाठी संशोधक विद्यार्थी कृती समितीच्या विद्यार्थ्यांनी बार्टी कार्यालयासमोर दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास बेमुदत उपोषण सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ति सर्व पात्र विद्यार्थ्यांना फेलोशीप मंजूर करावी व यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जात नाही तोपर्यंत उपोषण चालूच ठेवू असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सारथी, महाज्योती या संस्थांनी पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशीप दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ३०/०१/२०२३ रोजी सुरु केलेले आमरण उपोषण दिनांक ०१/०२/२०२३ रोजी मागे घेतले आहे. तदनंतर शासन पत्र क्र. सान्यावि २०२२/ प्र.क्र. २३०/ बांधकामे,दि.१२.४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये एकूण ८६१ विद्यार्थ्यांना

फेलोशिप देण्याकरिता मंजूरी दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची यादी बार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्यांना अवार्ड लेटर देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयात सीसीआयने कापूस खरेदी न केल्याबाबत

**(४३) ६२८१८ (११-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात सीसीआयने कापूस खरेदी केला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्केट शुल्क ५५ पैसे असावे या मुद्द्यावरुन ही कापूस खरेदी प्रलंबित असून जी खरेदी करण्यात आली आहे ती अत्यल्प असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाजारात कपाशीला काही दिवसांपूर्वी साडेआठ ते नऊ हजारांचा दर मिळत होता तोही आता कमी होऊन तो साडेसात ते आठ हजार रुपये झाला आहे यामुळे शेतकरी कापसाच्या दराबाबत अधिकच संभ्रमित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

भारतीय कपास निगम लि. (सीसीआय) यांनी महाराष्ट्र राज्यात एकूण ७१ कापूस खरेदी केंद्र सुरू केले असून त्यापैकी जळगाव जिल्ह्यामध्ये १० कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कापूस हंगाम २०२२-२३ करीता केंद्र शासनाने लांब धाग्याच्या कापसासाठी रु.६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु.६०८०/- प्रति क्विंटल इतका हमी दर जाहिर केलेला आहे. हंगामाच्या सुरूवातीला कापसास खुल्या बाजारात रु.९,५००/-प्रति क्विंटल इतका दर प्राप्त होत होता तर सध्या खुल्या बाजारपेठेत कापसाच्या गुणवत्तेनुसार कापसाचे दर प्रति क्विंटल रु.७,४५०/- ते रु.७,७००/- इतके आहेत.

(४) सध्या खुल्या बाजारपेठेत कापसाच्या गुणवत्तेनुसार कापसाचे दर प्रति क्विंटल रु.७,४५०/- ते रु.७,७००/- इतके प्राप्त होत असून सदर दर हे केंद्र शासनाने हंगाम २०२२-२३ करीता जाहिर केलेल्या दरापेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडून हंगाम २०२२-२३ करिता हमी दरावर कापूस खरेदी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठा तरुणांना आर्थिक दुर्बल गटातून (ईडब्लूएस) नोकरभरतीसाठी काढलेले सर्व शासन निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय लवादाने (मॅट) रद्द ठरविल्याबाबत

**(४४) ६२९७० (२५-०४-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा तरुणांना आर्थिक दुर्बल गटातून (ईडब्लूएस) नोकरभरतीमध्ये राज्य शासनाकडून देण्यात आलेली विशेष संधी आणि त्याबाबत काढलेले सर्व शासन निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय लवादाने (मॅट) रद्द ठरविल्याने शासन निर्णयांच्या आधारे शासकीय सेवेत आर्थिक मागास प्रवर्गातून संधी मिळणार नसल्याने मराठा तरुणांमध्ये असंतोष पसरल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा उमदेवारांना आर्थिक मागास या गटामध्ये आरक्षण देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता मात्र निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला येत्या चार आठवडयात आर्थिक मागास प्रवर्गातील उमदेवारांची अंतिम यादी तयार करण्याचे निर्देश दिले असून आर्थिक मागास प्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील निवड यादी तशीच ठेवण्याचे निदेश दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) होय
(२) होय
(३), (४) व (५) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबतचा दिनांक २३.१२.२०२० रोजीचा शासन निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक ०२.०२.२०२३ रोजी रद्द ठरविला आहे. यानिर्णयाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे. दिनांक ०८.०३.२०२३ रोजीच्या सुनावणीमध्ये पदभरतीची आहे ती स्थिती कायम ठेवण्याबाबत अंतरिम आदेश दिले आहेत.

---

## भोकरदन (जि.जालना) येथील आसपासच्या भागात व तालुक्यांत कोरोना व परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बससेवा कोलमडल्याबाबत

**(४५) ६३०१७ (२५-०४-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)भोकरदन (जि.जालना) तालुक्यात व आसपासच्या भागात कोरोनापूर्वी सुरू असलेली बससेवा, मुक्कामी जाणाऱ्या बसेस तसेच सुट्टीच्या दिवशी शालेय फेऱ्यासाठी सुरू असलेल्या बसच्या फेऱ्याही परिवहन महामंडळाने बंद केल्याने प्रवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्याबाबतची मागणी विभागातील लोकप्रतिनिधी, जागरूक नागरिक, विविध सामाजिक, धार्मिक संघटनांचे पदाधिकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व महाव्यवस्थापक, एसटी महामंडळ यांच्याकडे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना व परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बससेवा कोलमडली होती परंतु या समस्या मार्गी लागल्या तरीही भोकरदन तालुक्यातील पारध- वालसावंगी ही मालेगाव, तळणी येथे जाणारी बस, हसनाबादला मुक्कामी जाणारी बस बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, जाफराबाद तालुक्यातील शिंदी, आडा, बोरगाव, जानेफळ या ठिकाणी जाणाऱ्या बस सुट्टीच्या दिवशी बंद करण्यात आल्या असून आडा-भारज व जाईदेववाडी येथे मुक्कामी जाणाऱ्या बस कोरोना व संपानंतर बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार प्रवासी व विद्यार्थी यांची एसटी प्रवासाअभावी होणारी गैरसोय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) होय.
(२) नाही,
जाफराबाद आगारामार्फत माहे जून, २०२२ मध्ये माळेगांव- तळणी व हसनाबाद मुक्कामी बस सुरु करण्यात आल्या आहेत व त्या आज रोजी सुरु आहेत.

(३), (४) व (५) शिंदी, आडा, बोरगांव, जानेफळ या फे-या शालेय फे-या असल्याने व रविवारी शाळांना सुट्टी असल्यामुळे बंद ठेवण्यात येतात. तसेच आडा व जयदेवाडी मुक्कामी जाणाऱ्या फेऱ्याचे उत्पन्न कमी असल्याने सदर मुक्कामी फेऱ्या बंद केल्या आहेत. परंतु आडा येथील प्रवाशांसाठी जाफराबाद-आडा व भोकरदन मुक्कामी फेऱ्या सुरु आहेत. तसेच या तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व फेऱ्या सुरु करण्यात आल्या असल्याने विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय होत नाही.

---

## सांगली महानगरपालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध लसी व इंजेक्शनचा तुटवडा निर्माण झाला असल्याबाबत

**(४६) ६३०२१ (१२-०५-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध लसी व इंजेक्शनचा तुटवडा निर्माण झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध लसी, इंजेक्शनचा तुटवडा दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत मोफत लसीकरण करण्यात येणाऱ्या लसींपैकी PCV (Pneumococcal Conjugate Vaccine) व TD (Tetanus Diphtheria) या लसींचा तुटवडा निर्माण झाला होता. इंजेक्शनचा (सिरीजेस) तुटवडा झाला नाही. दोन्ही लसींच्या प्रत्येकी १०,००० डोसेसची मागणी उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, कोल्हापूर यांचेकडे करण्यात आली असून पाठपुरावा सुरु आहे. मागणीच्या अनुषंगाने पुरवठा अत्यल्प असल्यामुळे महानगरपालिकेकडे लसींचा तुटवडा निर्माण झाला आहे. लसींचा पुरवठा नियमितपणे झाल्यानंतर नागरीकांना उपलब्ध करुन देण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि. नाशिक) महानगरपालिका हददीतील थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यासाठी वार्ड निहाय पथक स्थापन केल्याबाबत

**(४७) ६३२१४ (२४-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका हददीतील थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यासाठी वार्डनिहाय पथक स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वार्डनिहाय पथकामध्ये कोणाकोणाचा समोवश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर पथकाने आतापर्यत किती जणांवर जप्तीची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर पथकाने केलेल्या कामाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर वार्ड पथकामध्ये सहायक आयुक्त, उप अभियंता, प्रभाग अधिकारी, उद्यान अधिक्षक, विद्युत अधिक्षक, कनिष्ठ अभियंता, वरीष्ठ लिपिक व लिपिक इत्यांदीचा समावेश करण्यात आला आहे.

(३) आतापर्यंत महानगरपालिकेव्दारे १६ जणांवर जप्तीची कारवाई केली आहे.

(४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ (३ ते ७) व प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ तरतदुीमध्ये नमूद प्रमाणे कार्यवाही करणे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या वाहनांना वाहतूक करण्यासाठी परिवहन विभागाकडून परवाना देण्याबाबत

**(४८) ६३३०८ (२५-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना शाळेशी करार असल्याशिवाय वाहतूक परवाना प्रादेशिक परिवहन विभागाकडून दिला जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसेस करीता) नियम, २०११ नुसार शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनाने शाळेशी करार करणे बंधनकारक नसल्याने सदरील वाहनांना परवाना देण्याबाबत तसेच इतर संबधित मागण्यासंदर्भात लातूर जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना,लातूर यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.प्रधान सचिव,गृह विभाग (परिवहन) व परिवहन आयुक्त,मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२३) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ मधील नियम ८ नुसार शाळेसोबत कंत्राट करार करणे बंधनकारक आहे. या संदर्भात संघटनेचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी शासन अधिसूचना दि.२२.३.२०११ नुसार महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ लागू केले आहेत.सदर नियमावलीनुसार स्कूल बस वाहनांना कंत्राटी परवाने जारी करण्यासाठी शालेय प्राधिकरणासोबत करार करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहिती व जनसंपर्क विभागाअंतर्गत विविध पदांकरिता उमेदवाराकडून ऑनलाइन अर्ज भरताना तांत्रिक त्रुटी येत असल्याबाबत

**(४९) ६३४४८ (१०-०५-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत काढण्यात आलेल्या माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत विविध पदांकरिता उमेदवाराकडून ऑनलाइन अर्ज भरण्यात आले असून अर्ज भरताना तांत्रिक त्रुटी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर, अमरावती व विदर्भातील अन्य विद्यापीठाकडून पदवी व पदव्युत्तर पदवी केलेल्या उमेदवारांचा अर्जच स्वीकारला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भरतीकरीता अर्ज भरण्याची मुदत २३ जानेवारी पर्यंत असल्याने जर वेळेत भरलेला अर्ज स्वीकारला नसल्यामुळे शेकडो बेरोजगारांच्या नोकऱ्यांच्या संधी जावू शकतात, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार तांत्रिक त्रुटी दूर करून विदर्भातील सर्व विद्यापीठांच्या पदवी व पदवीत्तर पदवी केलेल्या उमेदवारांचा अर्ज स्वीकारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. अशा आशयाचे काही उमेदवारांचे अर्ज या विभागास प्राप्त झाले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) काही पदव्यांसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त पत्रांच्या अनुषंगाने शासनाकडून स्पष्टीकरणात्मक खुलासा आयोगास पाठविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे समतुल्य पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अर्हताधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरीता दिनांक १० एप्रिल, २०२३ तसेच दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येऊन, दिनांक ८ मे, २०२३ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा आणि विदर्भातील मृद व जलसंधारणाच्या कामाचे एकत्रिकरण करण्याबाबत**

**(५०) ६३९४८ (२५-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा आणि विदर्भातील मृद व जलसंधारणाच्या सुमारे २७५ कोटीच्या कामांचे एकत्रीकरणाचा निर्णय जलसंधारण महामंडळाने घेतल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सदर कामात गैरव्यवहार करीत असल्याचे संशय घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
निविदा प्रक्रिया राबविताना प्रारुप निविदेस मान्यता देण्याचे अधिकार निविदा किंमत विचारात घेवून संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी / प्रादेशिक जलसंधारण अधिकारी/ अपर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य आयुक्त यांना आहेत. यास्तव निविदा एकत्रिकरणबाबतचा निर्णय सक्षम स्तरावर घेण्यात येतो. मराठवाडयातील ५९० जलसंधारण बांधकामाच्या १८२ निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या आहेत. तसेच विदर्भातील ५९९ जलसंधारण बांधकामांच्या ११९ निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या आहेत.
(२) नाही, हे खरे नाही.
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ स्तरावर कामांचे एकत्रिकरण केलेल्या प्रारुप निविदेस मान्यता देण्यात येत नाही. त्यामुळे गैरव्यवहार होत असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(३) निविदा एकत्रिकरणास महामंडळ स्तरावर मान्यता देण्यात येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता वाटत नाही.
(४) प्रश्न पद्भवत नाही.

---

**विधान भवन :**      **जितेंद्र भोळे**
**मुंबई.**      **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.